**भारत-अमेरिकेची सायबर गुन्हे तपास विषयक सामंजस्य करारावर स्वाक्षरी**

18 जानेवारी, 2025

भारत व अमेरिकेने सायबर गुन्हे तपासात सहकार्य विषयक सामंजस्य करारावर 17 जानेवारी 2025 रोजी वॉशिंग्टन डीसी येथे स्वाक्षरी केली.

2. श्री. विनय क्वात्रा (अमेरिकेतील भारतीय राजदूत) आणि श्रीमती. क्रिस्ट्री कॅनेगलो (प्रभारी उपसचिव, अमेरिका गृहसुरक्षा विभाग (DHS)) यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

3. भारताच्या वतीने सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (I4C), गृह मंत्रालय (MHA) यांवर असेल.  अमेरिकेच्या वतीने ही जबाबदारी गृहरक्षा विभाग (DHS) आणि त्यांच्या घटक संस्था U.S. इमिग्रेशन आणि सीमा शुल्क अंमलबजावणी विभाग (ICE) आणि गृहरक्षा सुरक्षा तपास सायबर गुन्हेगारी केंद्र (C3) यांवर असेल.

4. सामंजस्य करारामुळे दोन्ही देशांतील संबंधित यंत्रणांना सायबर धोक्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गुन्हे अन्वेषणासाठी डिजिटल फॉरेन्सिकचा वापर करण्यासाठी सहकार्य आणि प्रशिक्षणाच्या पातळीवर विकास साधता येईल.

5. दहशतवाद आणि हिंसक अतिरेकी कृती, दहशतवादी वित्तपुरवठा, अंमली पदार्थांची तस्करी, संघटित गुन्हेगारी, मानवी तस्करी, बेकायदेशीर स्थलांतर, मनी लाँडरिंग आणि वाहतूक सुरक्षा यासारख्या भारत आणि अमेरिकेला भेडसावणाऱ्या समान सुरक्षा आव्हानांशी सायबर गुन्हेगारीचा गुंतागुंतीचा संबंध आहे.  सायबर गुन्हेगारी तपास विषयक सामंजस्य करार आमच्या सर्वसमावेशक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारीचा एक भाग म्हणून भारत-अमेरिका सुरक्षा सहकार्य अधिक मजबूत करण्यास सक्षम करेल.

नवी दिल्ली

18 जानेवारी, 2025